

**संपादक परिचय -**

**प्रा.डॉ. शिवशंकर दगडू कसबे**

पत्ता : मु. क्रांतीनगर, खाडगाव रोड, लातूर
ता.जि. लातूर (महाराष्ट्र)

भ्रमणभाष : 9960654842

ई-मेल : kasbe_shiv@rediffmail.com

शिक्षण : एम.ए., पीएच.डी., नेट, सेट (लोकप्रशासन)

अध्यापन कार्य : दयानंद कला महाविद्यालय, लातूर

प्रकाशित ग्रंथ : लोकप्रशासनाची मूलतत्त्वे
साहित्यप्रतिभेचा सूर्य : अण्णा भाऊ साठे (संपादित)



**संपादक परिचय -**

**प्रा.डॉ. संग्राम मदन टेकले**

पत्ता : मु. कोयाजीवाडी, पो.सावरी,
ता.निलंगा, जि. लातूर (महाराष्ट्र)

भ्रमणभाष : 9767475537

ई-मेल : sangramtekale39@gmail. com

शिक्षण : एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच.डी., सेट, नेट (मराठी)

अध्यापन कार्य : श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

प्रकाशित ग्रंथ : मराठी कादंबरीतील भूकंपग्रस्तांचे चित्रण
मराठी ग्रामीण कादंबरी : आस्वाद आणि समीक्षा (संपादित)
फेसाटी : चिंतन आणि मंथन (संपादित)
साहित्यप्रतिभेचा सूर्य : अण्णा भाऊ साठे (संपादित)




ISBN - 978-81-948515-5-4

978-81-948515-5-4

SHAURYA PUBLICATION Latur
Publisher
Shaurya Publication


ISBN - 978-81-948515-5-4

## साहित्यप्रतिभेचा सूर्य
# अण्णा भाऊ साठे




संपादक
**डॉ.शिवशंकर कसबे**
**डॉ.संग्राम टेकले**

**Sahityapratibhecha Surya: Anna Bhau Sathe**

**साहित्यप्रतिभेचा सूर्य: अण्णा भाऊ साठे**

प्रकाशक व मुद्रक
शौर्य पब्लिकेशन,
अरुण गोदाम,
खाडगाव रोड, कपील नगर, लातूर-४१३५१२
मो. न. ८१४९६६८९९९

प्रथम आवृत्ती : ०१ जानेवारी २०२१

ISBN : ९७८-८१-९४८५१५-५-४

सर्वहक्क : डॉ. शिवशंकर कसबे, डॉ. संग्राम टेकले

मुखपृष्ठ सजावट - व्यंकटेश रेड्डी

अक्षरजुळणी
डॉ. वितेश भारत निकते, लातूर
मो. न. ९८८१८२१९०३

मूल्य : ४०० /-

नोट - या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्यासंबंधी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

## साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त संपादित ग्रंथ

## साहित्यप्रतिभेचा सूर्य : अण्णा भाऊ साठे

: संपादक :

डॉ. शिवशंकर कसबे

डॉ.संग्राम टेकले

:: संपादकीय सल्लागार मंडळ ::

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार | प्राचार्य डॉ. माधव गादेकर | प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड |
| प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे | प्राचार्य डॉ.आशा मुंडे | प्राचार्य डॉ. अजय पाटील |
| प्राचार्य डॉ.माधव कोलपुके | प्राचार्य डॉ.राम वाघ | प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे |
| उपप्राचार्य प्रा.संजय गायकवाड | उपप्राचार्य डॉ.राजकुमार मस्के | डॉ. शिवाजी जवळगेकर |
| डॉ. अंकुशकुमार चव्हाण | डॉ.रमेश पारवे | डॉ.त्र्यंबक मगर |
| डॉ.रामेश्वर खंदारे | प्रा.शरण निलंगेकर | डॉ.अशोक जाधव |
| डॉ.हर्षवर्धन कोल्हापुरे | डॉ. प्रदीप सूर्यवंशी | बालाजी सांळुके |
| उत्तम मिसाळ | दयानंद कांबळे | अशोक तोगरे |
| प्रा.राजेंद्र लोदगेकर | दिनकर मस्के | चंद्रकांत खुळखुळे |
| डॉ.गोपाळ गवळी | अनंत दोरवे | प्रभाकर कांबळे |
| संतोष मस्के | संतोष पटनुरे | दशरथ मस्के |

१०. वैजयंता : कादंबरी ते चित्रपट एक अनुबंध — ८१
डॉ. जयदेवी पवार,
११. सैराट आधीचं सैराट-अण्णा भाऊंच्या आवडीतलं प्रखर जातवास्तव — ८६
प्रा. निलेश पाटील
१२. लोकसमुहाची संघर्षगाथा: फकिरा — ९५
डॉ. प्रकाश सूर्यवंशी
१३. फकिरा: एक अवलोकन — १०५
प्रा. शिवाजी मोहाळे
१४. 'फकिरा' मधील अर्थकारण: चिंतनाचा विषय — ११०
डॉ. शिवराज पाटील
१५. अण्णा भाऊ साठे यांची कांदबरी — ११४
डॉ. गोविंद उफाडे
१६. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा मागोवा — १२३
डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी
१७. नव्या क्रांतीचे नाव फकिरा: एक चिंतन — १३२
प्रा. डोंगरे मनिषा सदाशिव

## विभाग तिसरा

## अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवन जाणिवा

१८. भारतातील दारिद्र्याचे भाष्यकार : अण्णा भाऊ साठे — १३८
डॉ. राजशेखर सोलापुरे
१९. उपेक्षितांचे भाष्यकार: अण्णा भाऊ साठे — १४४
डॉ. शिवशंकर कसबे
२०. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादी मूल्यविचार — १५५
डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
२१. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिकता — १६१
डॉ. विद्यादेवी कांबळे



२२. अण्णा भाऊ साठे: समतावादी साहित्यिक — १६५
प्रा. डॉ. रमेश लांडगे
२३. अण्णा भाऊ साठे वास्तववादी साहित्याचे शिरोमणी — १७४
प्रा. बालाजी एन. सोनकांबळे
२४. साहित्याचा महामेरु — १७८
संतोष मस्के
२५. मराठी साहित्याचा कोहिनूर-अण्णा भाऊ साठे — १८२
प्रा. सोनवणे महेश
२६. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवन जाणिवा — १८६
प्रा. डॉ. महादेव सदाशिव डीसले,
२७. लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे — १९५
प्रा. बळीराम आशा अंकुश मोठेराव

## विभाग चौथा

## अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील परिवर्तनवादी दृष्टिकोन

२८. अण्णा भाऊ साठे : वेदना आणि विद्रोह — २०४
प्राचार्य, डॉ. कमलाकर कांबळे
२९. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय विचार एक अभ्यास — २०९
प्रा. गायकवाड पी. के.
३०. अण्णा भाऊ साठे: दृकश्राव्य माध्यमाची जाणीव असलेले साहित्यिक — २१४
प्रा. डॉ. गोविंद काळे
३१. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील फुले-आंबेडकरांचा प्रभाव — २१८
प्रा. डॉ. सोमनाथ डी. कदम

# १५. अण्णा भाऊ साठे यांची कांदबरी

**डॉ. गोविंद उफाडे**
मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

कादंबरी हा वाङमयप्रकार जीवनप्रवाहाबरोबर चालणारा वाढत जाणारा आणि स्थल काल, परिस्थितीनुसार बदलत जाणारा आशय अभिव्यक्तीच्या नव्या परिणामामुळे अत्यंत सामर्थ्यवान बनत असलेला हा वाङमयप्रकार आहे. थोडक्यात डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'प्रदीर्घ भाषिकअवकाश असणारा त्याचबरोबर आशयसूत्रांचे अनेक पदर असलेला अनेक पात्र प्रसंगातून साकार होणारा कथात्मक साहित्य प्रकार[१] असा असला तरी हा वाङमयप्रकार मराठीतील कथा, कविता यापेक्षा उशीराने उदयास आला. जेष्ठ समीक्षक कुसुमाताई देशपांडे यांनी 'शे-दिडशे च्या आधी अठराव्या शतकात जन्माला आला'[२] असे म्हटले. यावरुन कादंबरीचे वय लक्षात येईल. पुढील काळात आंग्लसंस्कृतीच्या परिस्पर्शात कादंबरीच्या आशय, अभिव्यक्तीच्या जाणिवेत मोठ्या प्रमाणात विकास होत गेला. प्रारंभी समाजजीवनातील स्फोटक आशयद्रव्ये घेऊन कादंबरीने आपले वेगळे रुप सिद्ध केले, जेणे करून कथा, कवितेपेक्षा या प्रकाराने सर्वांचे लक्ष स्वत:कडे वेधून घेतले. त्याचे श्रेय बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीकडे जाते. विधवा स्त्रियांच्या भेडसावणाऱ्या समस्याला थेट हात घालण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला तो लक्षणीय होता.

वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. ना. सी. फडके यांनी मात्र आपल्या कादंबरीलेखनातून तत्कालीन मराठी कादंबरीला तंत्रा-मंत्रात अडकवून तिला कल्पनेची झालर प्रदान केली. त्यामुळे मराठी कादंबरी कल्पना मनोरंजनात आपले रूप घडवू लागली. परिणामी समाजस्तरातील अस्पृश्य, दीनदलित, भटका आदी समाजाच्या वास्तव दु:खांची, समस्यांची खदखदणारी सल मात्र त्यांच्या कादंबरीचा विषय होऊ शकला नाही. किंबहुना ती मध्यमवर्गीयांच्या मनाचे चोचले पुरविण्यासाठी रंजनात्मक आशय अभिव्यक्त करण्यात मशगुल होती असे चित्र तत्कालीन मराठी कादंबरीचे असल्याचे दिसून येते.

या कालखंडात अण्णा भाऊ साठे यांचा उदय झाला. परिणामी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मातंग समाजात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला असला तरी त्यांच्या लेखनावर प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांच्या लेखनाचा प्रभाव होता. ते त्यांच्या काही कादंबऱ्या वाचल्या की जाणवते आणि ते साहजिक होते. परंतु त्यांच्या अनेक



कादंबऱ्यांचे वाचन केल्यानंतर असे दिसून येते की, कादंबरीकारांकडे जी नैतिकता असायला हवी ती एकमेव अण्णा भाऊ साठे यांनी पाळली असे म्हणता येईल.

अण्णा भाऊ साठे यांनी वास्तव समाजजीवनातील वर्षानुवर्षे दयनीयजीवन भोगणाऱ्या अस्पृश्य, भटक्या, पददलित वंचितांमधील कुरुपता स्वीकारुन त्याला सौंदर्याचे लेणे चढवून साहसी, क्रांतिकारी, स्वत:च्या जीवाची पर्वा न करणारा नायक, त्याचबरोबर लक्षवेधक नायिका उभ्या करून मराठी कादंबरीला हादरे देणारे अण्णा भाऊ साठे हे एकमेव कादंबरीकार होते असे म्हणता येईल. म्हणून त्यांचा साहित्यसम्राट म्हणून जो गौरव होत आहे तो या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो.

अण्णा भाऊ साठे यांनी बहिष्कृत समाजजीवनाचे दु:ख स्वत: अनुभवले, जाणले असल्याने त्या समाजातील वास्तव दु:खांचे ताने-बाने आपल्या कादंबरीलेखनातून प्रखरपणे मांडण्याचा प्रयत्न केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका भाषणात लेखकाला उद्देशून बोलताना म्हणतात की, "साहित्यिकांनो आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती मर्यादीत करू नका, तिला खेड्यापाड्यातील अंधार दूर करील असे परावर्तीत करा. आपल्या या देशात उपेक्षित दु:खितांचे फार मोठे जग आहे ते विसरू नका. त्यांचे दु:ख त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न करा. त्यातच खरी मानवता आहे."३ हा विचार उराशी बाळगून अण्णा भाऊ साठे यांनी साहीत्यलेखन केले आहे असे त्यांच्या कादंबऱ्या वाचून म्हणावेसे वाटते. कादंबरीला परिस्पर्श न केलेल्या आशय, जीवनजाणिवेला स्पर्श घडवून मराठी कादंबरीत नवेपण आणणारे तत्कालात अण्णा भाऊ एकमेव कादंबरीकार असावेत असे म्हणता येते.

मराठीतील या थोर कादंबरीकाराला अस्पृश्य समाजजीवनातील विविध विषय आपल्या कवेत घेऊन आस्थेने मोठ्या कलात्मकतेतून अत्यंत प्रभावी भाषेतून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा अनुभव त्यांनी लिहिलेल्या ३५ कादंबऱ्या वाचल्या की समजते.

उदा :- रानगंगा (१९३५), चित्रा, (१९५१), वारणेच्या खोऱ्यात (१९५१) फकिरा (१९५२), वैजयंता (१९५९), माकडीचा माळ (१९६३) अलगूज (१९६३), चंदन (१९६२), आवडी (१९६३), गुलाम (१९६४), धुंद (१९६६), तारा (१९६७), अहंकार (१९६७), वारणेचा वाघ (१९६८), मयुरा (१९६८), केवड्याचं कणीस (१९६९), अग्नीआरण्य (१९६९), संघर्ष (१९६९), रूपा (१९६९), मूर्ती (१९७०), मंगला (१९७१), चिखलातील कमळ (१९७४), राजा (१९७५), फुलपाखरु (१९७५), मास्तर (१९७६), पाझर (१९७६)

दी या कादंबऱ्यामधून (काही अपवाद) समृद्ध रूपाचा अविष्कार अभिव्यक्त झालेला दिसून येतो. या कादंबऱ्यांचे वर्गीकरण मोजक्या भाषेत करण्याचा प्रयत्न जेष्ठ अभ्यासक डॉ. बजरंग कोरडे यांनी साहित्य अकादमी ने प्रसिद्ध केलेल्या 'अण्णा भाऊ साठे'४ या ग्रंथामधून केला आहे. तो अत्यंत अभ्यासपूर्ण आहे; परंतु अण्णा भाऊंनी अनेक कादंबऱ्यांमधून वंचित अशा अस्पृश्य, दलित, भटक्या, जाती-जमातीचे धगधगते पलिते अत्यंत परखड, निर्भिड भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे हे त्यांच्या काही कादंबऱ्या पाहिल्या असता समजून येते.

यांचे उदाहरण म्हणून त्यांची 'माकडीचा माळ' (१९६३) ही कादंबरी जरी अभ्यासली तरी अण्णा भाऊंनी ज्या समाज घटकांचा जीवन स्तर, त्यांचे जगणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन किती भयावह आहे हे रेखाटण्याचा प्रयत्न या कादंबरीमधून केला गेला आहे तो लक्षणीय वाटतो. कारण गावाच्या बाहेर कोसो मैल दूर पाल ठोकून आपले जीवन व्यतित करणाऱ्या वंचित जीवनाची व्यथा इथे मांडली आहे. उदा. डवरी, डोंबारी, फासेपारधी, वैदू, दरवेशी, नागवाले, पुंगीवाले, नंदीवाले, पांगुळ, वासुदेव, मसणजोगी, गारुडी, तुलबाले, घिसाडी, अशा नानाविध भटक्यांचे जीवनविश्व त्याबरोबरच यांच्या जगण्याचे, त्यांच्यातील वृत्ती-प्रवृत्तींचे, आशा-आकांक्षांचे, प्रेम, वात्सल्य, कारुण्याचे वास्तवचित्र या कादंबरीतून चित्रीत झालेले आहे. हे जीवन स्तर चित्रीत करणारे मराठी कादंबरीमध्ये अण्णा भाऊ साठे हे एकमेव कादंबरीकार असावेत असे वाटते.

खरे तर संवेदनशील लेखक ज्या वातावरणात वावरत असतो. त्याचा काही एक परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावर पडतच असतो हे अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनातून कळत जाते. म्हणूनच त्यांनी जे जग चितारले त्यातील वेगवेगळ्या व्यक्ती जिवंत वाटतात. उदा. बाळा डोंबारी हा रंगेल माणूस व्यंकूचा मित्र, पोट वाढलेला काळाकुट्ट रंगा स्वतःच्या तीन सुंदर गोंडस मुलींना सोबत घेऊन तमाशे करतो आणि धनिकांचे खिसे रिकामे करतो, मख्या माकडाला दुर्गा सून व्हावी म्हणून धडपड करतो. दुर्गाचा बाप असणारा यंकू मुलीवर जीवापाड प्रेम करीत प्रेम वात्सल्याचा वर्षाव करणारा, पर्वताप्रमाणे धिप्पाड, कणखर मनाचा डवरी अशा प्रकारच्या भटक्या समाजजीवनातील नाना वृत्ती-प्रवृत्तीची माणसं असूनही ते सर्व एकोप्याने, आनंदाने आपले जीवन जगत असल्याचे चित्र या कादंबरीमधून प्रगट केले आहे. अण्णा भाऊ लिहितात, 'अशी माणसं त्या माकडीच्या माळावर जगत होती. जगण्याविषयीचं त्यांना अपार प्रेम होतं. ही सृष्टी पिकावी, फुलावी, फळाला यावी. शेतकऱ्याने सुखी व्हावे नि उदार होऊन भीक पदरात टाकावी. एवढीच इच्छा उराशी



बाळगूण ही माणसं माकडीच्या वैराण माळावर गुण्या गोविंदाने नांदत होती (पृ.४०)' खरे तर जगात त्यांचे स्वतःच्या मालकीचे असे काहीच नसतानासुद्धा जग सुखी व्हावे, शेतकरी सुखी व्हावा तरच आपण सुखी होऊ या विशाल मनाची व्यापकता या कादंबरीच्या रूपातून साकार झाली आहे हेच या कादंबरीचे यश आहे.

वारणेचा वाघ (१९६८) ही एक अण्णा भाऊ साठे यांची लक्षणीय आशयाची कादंबरी आहे. या कादंबरीमधून त्यांनी अस्पृश्य असणाऱ्या मातंग (मांग) समाजातील नायकाचा साहसपूर्ण, रोमहर्षक स्वाभिमान इतिहास चित्रीत झाला आहे. या कादंबरीतील नायक सत्तू भोसला लष्करात भरती होतो. परंतु लष्कर अधिकारी असणाऱ्या रॉबर्ट यांची एकुलती एक अत्यंत रूपवान असणारी मुलगी सत्तुच्या प्रेमात पडते ती त्याच्या गुणांचे सातत्याने वर्णन करते त्यामुळे तिचा पिता रॉबर्ट अस्वस्थ होऊन सत्तूचा विनाकारण छळ करतो, त्याची सातत्याने फजिती, अपमानास्पद वागणूक देतो. हे सत्तू भोसल्यासारख्या प्रामाणिक स्वाभिमानी जवानाला जिव्हारी लागते. त्यामुळे तो पदाचा राजीनामा देतो आणि उर्वरीत आयुष्य जन्मगावाची सेवा करण्याचा संकल्प तो करतो. अशा स्वाभीमानी धाडसी, जवानाच्या स्वभावाचा वेध घेणारी एक वेगळी कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख करता येईल.

उदा. सत्तू भोसल्याने दांडगेश्वर गुंडासारख्या कित्येकांना चिरडून टाकले. गावातील दीन-दलितांना छळणाऱ्या सावकाराच्या कर्जाच्या नोंदी असणाऱ्या वह्या नि गहाणखते जाळून टाकून या जुलूमशाहीतून गावाला मुक्ती देणारा सत्तू भोसला होता. या वाघामुळे वारणेचा काठ हादरत होता तर दीन-दलितात आनंदाच्या लहरी येत होत्या. तसेच स्त्रियांवर अन्याय अत्याचार होत असलेला पाहून सत्तू भोसला अस्वस्थ होतो. त्यामुळे नवऱ्याने टाकलेल्या मुलींना पुन्हा नांदविण्यास घेऊन जात असत. सोडलेली बायको घरात येत नाही असे म्हणणाऱ्यांची तो गावात वरात काढीत असत. त्यामुळे कैक नवरोबांनी सत्तू भोसल्याची धास्तीच घेतली होती. तर अनेक नवरोबांना त्याने एक पायावर उभं राहण्याची शिक्षाही तो करीत होता. लेकीच्या लाडक्या बापाचा कडक दम भरुन आणि रंगदार जावयाची रग जिरवून अनेक लेकी बाळीचे संसार सावरणारा वारणेचा वाघच होता सत्तू भोसला. त्याच्या दबदब्यामुळे गावातील मुली दिल्याघरी सुखाने नांदत होत्या नि त्या सत्तुला आपला पोटचा भाऊ मानून त्याला आशिर्वाद देत होत्या. ही प्रेमाची अनोखी भेट अण्णा भाऊंनी या कादंबरीच्या रूपाने मराठी कादंबरीला दिली आहे असे म्हणता येईल.

तसे पाहिले तर त्यांच्या समकालीन कादंबरीकारांनी स्त्रियांचे चित्रण ह उपभोगाची
स्तू या अंगानेच अधिक प्रमाणात झालेले दिसून येते. त्यामुळे स्त्रियांच्या दुःख, दारिद्र्याचे, षितांचे चित्रण तत्कालीन कादंबरीकारांनी फारसे केले नाही म्हणून तत्कालीन समीक्षक . लक्ष्मीबाई किबे यांनी यासंदर्भात जे मत अभिव्यक्त केले होते ते चिंतन करण्यास भाग डते. त्या म्हणतात की, 'प्रस्तुत कादंबरीकारांनी नुसत्या प्रेमविषयक पाल्हाळाचे खोटे दर्शन आमच्याकडे न ठेविता जेणेकरुन निद्रानाश झालेल्या आमच्या स्त्री वर्गाला, जोहिन बनलेल्या तरूण मुला-मुलींना आणि दुहिच्या आगीत नित्य जळत असलेल्या माजाला ऐक्याचे प्रयत्न कादंबरीकारांच्या हातून झाले पाहिजे.'५ ही अपेक्षा अण्णा भाऊंनी ादंबरी लेखन करून पूर्ण केले असल्याचे दिसते. उदाहरण म्हणून त्यांच्या चित्रा, वैजयंता, दन, चिखलातील कमळ, फुलपाखरु, टिळा लावते मी रक्ताचा, रत्ना आदि कादंबऱ्यांचे ।धे वाचन जरी केले तरी स्त्री समस्या, शोषण, दारिद्र्य या संदर्भातील वास्तव मांडणी त्यंत कलात्मक भाषेत मांडणारे अण्णा भाऊ साठे तत्कालात एकमेव कादंबरीकार सावेत असे वाटते.

चित्रा (१९५१) या कादंबरीतून अण्णा भाऊंनी मुंबईसारख्या महानगरात ौद्योगीकरणाने तेथील लोकांच्या वासनांध वखवखलेल्या नजरा, स्त्रीचा केवळ शारीरिक खासाठी अमाप पैशाचा वापर करुन तिच्या शरीराचे लचके कसे तोडत आहेत आणि स्त्री ला बळी पडत आहे, दारिद्र्याचे चटके सहन करत असलेल्या स्त्रीला सुखाची स्वप्ने खवून दलालाकरवी तिची फसगत करुन स्वतःची पोळी भाजत असणारी पुरूषवृत्तीचे ात्र अण्णा भाऊंनी या कादंबरीत मांडले आहे.

अस्पृश्य वंचित स्तरातील स्त्रीच्या दुःखाची गाथा म्हणजे अण्णा भाऊ साठे यांची वत्रा' ही कादंबरी. म्हणून तर रशियन भाषेत अनुवादित झालेली आणि तेथील जनतेच्या नावर अधिराज्य गाजवणारी ही कादंबरी आहे.

या कादंबरीची नायिका 'चित्रा' आणि 'सोना' या दोघी सख्या बहिणी आहेत. यांना न्मापासूनच दारिद्र्याच्या झळा सोसाव्या लागल्या आहेत. कळण्यापूर्वी वडिलांचे जाणे ्हणून आईने भावाकडे आश्रयास जाणे. जसे-जसे स्त्रीचे तारुण्य फुलू लागते तसे तसे ावातील तरुणांच्या विकृत नजरा स्त्रीकडे पडतात. आई म्हणून सोना आणि चित्राची ाईला काळजी वाटते म्हणून आपल्या भावाने त्यांच्या लग्नासाठी काहीतरी करावे अशी रुणा भाकते. या परिस्थितीचा फायदा घेऊन रक्ताचे नाते असणारा भाऊ मुंबईला सोनाला ालाच्या हवाली करतो आणि 'सोना' ही महानगरातील पैशाच्या मुजोरीमुळे वासनांध,



शरीरसुखास लालचावलेल्यांच्या जाळयात सोना अडकते. त्यातून ती बाहेर येऊच शकत नाही म्हणून आपल्यासारखी परिस्थिती आपल्या बहिणीवर म्हणजे 'चित्रा' वर येऊ नये यासाठी ती हरतऱ्हेचे प्रयत्न करते परंतु त्यात सोनाला अपयश येते. सुंदर असणारी 'चित्रा'ही या वासनांधतेचा बळी पडते. स्त्री शोषणांच्या दुःखाची किनार 'चित्रा' कादंबरीला असल्याने ही कादंबरी वाचकांचे लक्ष वेधून घेते.

अण्णा भाऊंचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कादंबरीतून फक्त वंचित माणसाचे जग डोकावते. त्यांची 'वैजयंता' (१९५९) ही कादंबरी वाचल्यानंतर याचा प्रत्यय येतो. अस्पृश्य अशा वंचित समाजातील स्त्रियांना पोटाची खळगी भरण्यासाठी तमाशामध्ये नाचगाणे करावे लागते परिणामी त्यांना विकृतमनोवृत्तीच्या पुरुषांकडून अनेकविधप्रकारे त्रास दिला जातो व तो सहन करण्याशिवाय दुसरा पर्यायच त्यांच्याकडे नसतो म्हणून नानाविध समस्यांना स्त्री कलावंताला सामोरे जावे लागते याचे विदारक चित्र 'वैजयंता' कादंबरीमधून अण्णा भाऊंनी रेखाटले आहे.

वैजयंता ही तमासगिरीन गजरावाईची अत्यंत रुपवान व देखणी अशी मुलगी असते. ती आईसोबत तमाशामध्ये नाचगाणे करण्यास जेव्हा सुरुवात करते तेव्हा खुंदलपूरचे अण्णासाहेब पाटील, बाबालाल सेठ यांचा मुलगा चंदुलाल यांसारखे वासनेने वखवखते लोक वैजयंताच्या पिच्छावर असतात. याचा अतोनात त्रास वैजयंताला सहन करावा लागतो किंबहुना विकृत भावनेच्या नजरेने जणू तिचे शोषणच होते. ही व्यथा मोठ्या कलात्मकतेने या कादंबरीतून मांडली आहे. त्यामुळे जेष्ठ समीक्षक डॉ. बजरंग कोरडे यांनी 'तमाशा कलावंताच्या समस्येचा वेध घेणारी 'वैजयंता' ही कादंबरी मराठीत पहिलीच कादंबरी वाटते'६ असे विधान केले. यावरुन या कादंबरीचे सामर्थ्य लक्षात येते. याचबरोबर अण्णा भाऊ साठे यांनी सामाजिक विषयांबरोबर काही प्रेमकथांचा सुद्धा आविष्कार आपल्या कादंबरीमधून केला आहे आणि तो साहजिक होता. कारण त्यांच्या समकालात प्रा. ना. सी फडके यांच्यासारख्या कादंबरीकारांना युगकर्ते म्हणून वाङ्मयेतिहासकारांनी गौरव केला.७ त्यांनी सुद्धा प्रेमप्रकरणातील पाल्हाळिक वर्णनाशिवाय दुसरे काय केले? असा प्रश्न पडतो. त्यामुळे अण्णा भाऊंनी चंदन, फुलपाखरू, अलगुज आदि. कादंबऱ्यातून प्रेमकथांचे पाल्हाळीक वर्णन केले आहे असे म्हणता येईल.

उदा. 'अलगुज' या कादंबरीत गरीब असणारा नायक आणि श्रीमंत नायिका यांच्यातील प्रेमांचे वर्णन अत्यंत कलात्मक पातळीवर करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीत गणू मोहिते हे सधन आणि कुलीन घराण्यातील शेतकरी आहेत. त्यांची एकुलती

अत्यंत रुपवान मुलगी रंगू ही अत्यंत गरीब, अठराविश्व दारिद्र्यातील 'बापू' च्या प्रेमात पडते यांच्यातील तरल भावनांचे अविष्कार या कादंबरीतून अभिव्यक्त झाले आहे हे लक्षवेधक वाटतात.

अण्णा भाऊ साठे यांना मराठी कादंबरीत महत्त्व प्राप्त झाले ते 'फकिरा' या कादंबरीमुळे लोकमनाचा उत्तम अविष्कार असणारी ही कादंबरी १९५९ ला प्रकाशित झाली. तिच्या आशय अविष्कारामुळे साऱ्यांच्या नजरा या कादंबरीकडे आकर्षित झाल्या ते तिच्या सामर्थ्यामुळे. प्रसिद्ध कादंबरीकार वि. स. खांडेकरांनाही या कादंबरीचा आशय लक्षणीय वाटतो. ते म्हणतात की, 'अपरिचित असणाऱ्या समाजाच्या जीवन जाणिवा अभिव्यक्त करणारी ही कादंबरी एकूण मराठी कादंबरीत अद्वितीय वाटते.८ तर जेष्ठ समीक्षक नरहर कुरुंदकर यांनी म्हटले की, 'अण्णा भाऊ साठे यांनी केवळ 'फकिरा' चेच लेखन केले असते तरीही ते सर्वश्रेष्ठ कादंबरीकार ठरले असते. इतकी अद्वितीय कादंबरी आहे.'९ अशा शब्दात अनेक अभ्यासकांनी आपापले मत नोंदविण्याचा प्रयत्न केला आहे. खऱ्या अर्थाने जे विविध अभ्यासक, सुऱ्हदयी रसिक, वाचक इत्यादींना जी कलाकृती चिंतनप्रवृत्त करते तीच अक्षर साहित्य असते. म्हणून फकिरा ही अक्षर कलाकृती आहे. ज्यामधून लोकमाणसाचा उत्तम अविष्कार यातून घडलेला आहे. त्यामुळे मराठी कादंबरीच्या जाणिवेच्या अविष्काराच्या कक्षा रूंद करण्यास ही कादंबरी यशस्वी झालेली आहे हे लक्षात घ्यावे लागते. पारंपरिक मध्यमवर्गीयांऐवजी गावकुसावाहेरील अपरिचित अशा अस्पृश्य, वंचित समाजजीवनातील क्रांतीकारी नायकांची रोमहर्षक कथा अत्यंत कलात्मकपणे मांडण्याचा अण्णा भाऊंनी जो प्रयत्न केला तो लक्षणीय वाटतो.

या कादंबरीमध्ये जो संघर्ष दिसतो तो गावपातळीवरचा आहे. त्यामुळे या संघर्षामधून निर्माण झालेला ताणतणाव गुंतागुंत, विविध वृत्ती-प्रवृत्तीतून निर्माण झालेल्या अस्वस्थ जाणिवा यातून या कादंबरीचा आशय समृद्ध होत जातो.

वाटेगाव आणि शिगाव हे दोन्ही जेमतेम लोकसंख्या असलेले गाव आहे. प्रत्येकाला आपआपले गाव सर्वार्थाने समृद्ध व्हावे याची आस असणे साहजिक पण इर्षा भयानक. हेच चित्र या कादंबरीमध्ये पहावयास मिळते. जोगतिनीची यात्रा या संघर्षाचे मूळ. आर्थिक स्थिरता व्हावी म्हणून यात्रांचे आयोजन गावागावांत होत असते. इथे मात्र वेगळी प्रथा जो जोगतिनींच्या जवळची खोबऱ्याची वाटी हिसकावून घेऊन जाईल तेथे ही यात्रा भरेल अशी अट; पण ही वाटी घेऊन जाणे येरागबाळ्याचे काम नाही. कारण त्या जोगतिणी गावाच्या सुरक्षिततेत असतात. अशा स्थितीत वाटेगावाला मांगल्य यावे, आर्थिक,



सांस्कृतिक, सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यामुळे गावचे पाटील विष्णुपंत कुलकर्णी अस्वस्थ होतात. पूर्ण गावाला या अवस्थेत पाहून मातंग समाजातील राणोजी शिगावच्या जोगतिनीची वाटी गावासाठी आणीन असा निश्चय करुन तो शूरवीर शिवगावच्या दिशेने झेप घेतो. तो वाटीही हिसकावून घेवून येतो पण वाटेगावची शीव ओलांडण्यापूर्वी त्याला शिगावच्या लोकांनी ठार मारले, त्याचा प्राण गेला. गावासाठी शहीद झाला. पुढे याच बापाचा फकिरा चिडसंतापाने पेटून उठतो अन् या व्यवस्थेला चितपट करतो. अशाप्रकारे ही कादंबरी जात-पात विसरुन ग्रामजीवनाच्या एकात्मतेचे दर्शन घडविणारी वाटते. त्याचबरोबर वर्षानुवर्षे कुरुप, दरोडेखोर म्हणून शिक्का मारला गेलेल्या मातंग समाजाला नायक, वीर, साहसी अशा व्यक्तिमत्वाचे वर्णन अण्णाभाऊ अगदी एकजीव होऊन करतात. यातून खरा कादंबरीकार दिसून येतो. थोडक्यात त्यांनी कुरुपता स्वीकारुन त्याला सौंदर्याचे परिमाण दिले अन् हीच खऱ्या लेखकांची नैतिकता असते.

या कादंबरीचा आणखी एक विशेष म्हणजे ही कादंबरी अन्याय, अत्याचार, विषमता, शोषण यांना आव्हान देते. समता, बंधुता, मानवता तथा आर्थिक समतोल साधणारी व्यवस्था प्रत्यक्षात आणण्याच्या श्रद्धेने बलदंड अशा नायकाचे दर्शन घडविते. अशा प्रकारे उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविणाऱ्या श्री. म. माटे तथा ग. ल. ठोकळ यांच्या 'गावगुंड' मधील नायक - नायिकापेक्षाही अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कादंबरीतील नायक-नायिकाचे चित्र वेगळे केले आहे. उदा. वैजयंता, चित्रा, सत्तु भोसला, फकिरा, हिंदुराव, रायनायक महार, राणोजी, विष्णुपंत कुलकर्णी अशी लक्षवेधक पात्रे उभी केली आहेत.

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीची भाषा ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुळात अस्सल देशीपणाचा बाज त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रगटला आहे. लोकम्हणी - लोकरुढी - संस्कृती इत्यादीमधून लोकमनाचा आविष्कार करण्याची त्यांची रीत लक्षणीय वाटते.

**निष्कर्ष :**

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्याचे वाचन केल्यानंतर काही निष्कर्ष नोंदविणे मला महत्त्वाचे वाटते ते खालीलप्रमाणे -

१) अण्णा भाऊ साठे यांच्या काही कादंबरीमधून कल्पनेचा बाज असण्याचे कारण म्हणजे तत्कालीन कादंबरीकारांचा काही प्रमाणात पडलेला प्रभाव होय.

२) माणसांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या अण्णा भाऊंनी त्यांच्या गुणदोषासह स्वीकारुन त्यांना कादंबरीमधून न्याय देण्याची भूमीका बजावलेली आहे

३) अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांकडे पाहिले असता त्यांनी अवतीभोवती पसरलेले दुःख, दारिद्र्य व अज्ञान आदींना कवेत घेऊन त्याचा अविष्कार कादंबरीमधून केला आहे.

४) मराठी साहित्यात नैतिकता, जीवनमूल्यांची प्रतिष्ठापणा करणारे तत्कालात अण्णा भाऊ साठे महत्त्वाचे कादंबरीकार वाटतात.

अशा प्रकारे मराठी कादंबरीमध्ये महत्वाचे कादंबरीकार असणारे अण्णा भाऊ साठे यांनी विपूल प्रमाणात कादंबरीलेखन करुन सर्व स्तरावरील दीन-दलित, अस्पृश्य, भटके, आदींच्या सुख-दुःखाला आपल्या कादंबरी लेखनातून उजागर करण्याचे प्रयत्न केले. माकडीचा माळ, चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, वैजयंता, आदी कादंबऱ्यातून त्याचे दर्शन घडते. वारणा खोऱ्यातील बोलीभाषा, उपमा, म्हणी, वाक्यप्रचारातून त्यांची भाषा लक्ष वेधून घेते. मानवोमूल्यांचा उद्‌घोष करणाऱ्या त्यांच्या अपवाद सोडला तर अनेक कादंबऱ्या आहेत. कुरुपता, दारिद्र्यता, स्वीकारुन त्याला सुंदरता देऊन समाजाला नवी आशा, दिशा देण्याचे महत्त्कार्य अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीने केले आहे.

**संदर्भ सूची :-**


१) नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३, पृ. ३७

२) देशपांडे कुसुमावती, मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, पृ. ७

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अध्यक्षीय भाषण, विदर्भ साहित्य संघ, १९५२

४) कोरडे बजरंग, अण्णा भाऊ साठे, साहित्य अकादमी, पृ. ९

५) किबे कमलाबाई, ज्ञानविस्तार अंक, १९६३, पृ ४५७

६) कोरडे बजरंग, अण्णा भाऊसाठे, साहित्य अकादमी, पृ. १०

७) देशपांडे अ.ना.,आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, खंड - २, पृ. १२५

८) कुरुंदकर नरहर, धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, पृ. २२७.

९) वाकोडे मधुकर, प्रतिष्ठान, एप्रिल - मे १९६३, पृ १७.

१०) शेळके भास्कर, मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरुप आणि विश्लेषण, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.




## १६. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा मागोवा


डॉ. लक्ष्मीकांत धोंडोपंत कुलकर्णी

लातूर.


तुकाराम भाऊराव उर्फ शाहीर अण्णा भाऊ साठे हे एक मराठी समाज सुधारक, दीन दुबळ्यांचे, उपेक्षितांच्या जीवनाचे वास्तव चित्रण करणारे साहित्यिक, लेखक होते. ते कधीच शाळेत गेले नाहीत परंतु तरीही आपल्या लेखणीच्या जोरावर समाजमन ढवळून काढण्याची शक्ती त्यांच्यामध्ये होती.

१ ऑगस्ट १९२० रोजी मातंग समाजातील भाऊ सिध्दोजी साठे आणि वालुबाई यांच्या पोटी अण्णांचा सांगली जिल्ह्यातील वाटेगांव येथे जन्म झाला. साठे यांचा जन्म हा इतिहासातील एक दुर्बिळ योगायोग म्हणू शकतो. ज्या दिवशी अण्णा भाऊ जन्माला आले त्याच दिवशी १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे निधन झाले होते. एक तारा अस्ताला जात असतानाच दुसरा सूर्य त्याच दिवशी जन्म घेत होता. अण्णा भाऊंचा साहित्य सागर खालील प्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | लोकनाट्य | ०३ | नाटके | १३ | कथासंग्रह |
| ३५ | कादंबऱ्या | ०१ | शाहिरी पुस्तक | ०१ | प्रवास वर्णन |
| ०७ | चित्रपट कथा | | | | |

अण्णा भाऊ साठे यांच्या चतुरस्त्र प्रतिभेने साहित्याच्या अनेक क्षेत्रात चौफेर लेखन केले आहे. तरी आज आपण त्यांच्या काही महत्त्वपूर्ण कादंबऱ्याचा मागोवा घेत आहोत. अण्णा भाऊ साठे यांनी उच्च वर्णीय, मध्यमवर्गीय शहरी भागातील माणसाला साहित्याचे केंद्रबिंदू न ठेवता दीन दलित तळागळातील ग्रामीण भागातल्या माणसाला साहित्याचे मध्यवर्ती केंद्रस्थान मानले आणि त्याच पद्धतीने त्यांनी कादंबरी साहित्य लेखन केले आहे. अण्णा भाऊंनी एकंदर पस्तीस कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. काळजीपूर्वक पडताळा घेताना असे दिसते की अण्णा भाऊ यांच्या कादंबऱ्याचे ढोबळ मानाने चार प्रकारामध्ये वर्गीकरण करता येऊ शकते.

१) साहसाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या.

२) महिलांच्या समस्यांचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या.

३) प्रेमाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या.

४) ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या.